**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक १४ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. **भारताचे ५२वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांचा शपथविधी.**
2. **राज्यातील देवस्थान जमिनींची खरेदी विक्री नोंदणी थांबवावी -महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश.**
3. **नागपूर जिल्हयातील कामठी इथं शंभर खाटांच्या रुग्णालयासाठी सहा एकर जमीन.**
4. **उद्या आणि परवा विदर्भातील पूर्व भागात वादळी पर्जन्यमानाचा यलो अलर्ट जारी.**

-------------------------------------

**सरन्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई**

**भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांचा शपथविधी आज नवी दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पदाची शपथ दिली.**

***(होल्ड बाईट- शपथ विधी)***

***मैं भूषण रामकृष्णा गवई, जो भारत के उच्चतम न्यायालय का मुख्य न्यायमूर्ति नियुक्त हुआ हूँ स्वच्छ निष्ठा से प्रतिज्ञा करता हूँ, कि मैं विधि द्वारा स्थापित भारत के संविधान के प्रति सची श्रद्धा और निष्ठा रखूँगा, मैं भारत की प्रभुता और अखंडता शून्य रखूँगा । तथा मैं सौम्य प्रकार से और श्रद्धापूर्वक तथा अपनी पूरी योग्यता, ज्ञान और विवेक से अपने पद के कर्तव्यों का भय या पक्षपात अनुराग देश के बिना पालन करूँगा तथा मैं संविधान और विधियों की मर्यादा बनाए रखूँगा।***

**उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, तसंच केंद्रीय मंत्रिमंडळाचे इतर सदस्य आणि सर्वोच्च न्यायालयातले इतर न्यायाधीश या समारंभाला उपस्थित होते. सरन्यायाधीश गवई हे मूळचे विदर्भाचे असून अमरावतीचा त्यांचा जन्म आहे. १९८५ पासून त्यांनी त्यांच्या कारकिर्दीला सुरवात केली त्यांनतर**

त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात देखील कार्य केले. २०१९ मध्ये त्यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियक्ती झाली.

-------------------------------------

डॉ.अजय कुमार

राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी डॉ.अजय कुमार यांची संघ लोक सेवा आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. कार्मिक आणि प्रशिक्षण विभागानं जारी केलेल्या आदेशानुसार, अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यावर डॉ.कुमार यांचा कार्यकाळ सुरु होईल. डॉ.कुमार भारतीय प्रशासकीय सेवेतून निवृत्त झाले आहेत. ते १९८५ च्या तुकडीतले केरळ केडरचे अधिकारी आहेत. त्यांनी यापूर्वी संरक्षण सचिव म्हणून काम पाहिलं आहे.

-------------------------------------

ऑपरेशन सिंदूर

दहशतवादाविरोधात भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरचं देशोदेशीच्या संरक्षणविषयक तज्ञांनी कौतुक केलं आहे. अमेरिकेचे माजी लष्करी अधिकारी डॉन स्पेन्सर यांनी म्हटलंय की पहलगाम हल्ल्यानंतर भारताने अजिबात वेळ न दवडता सूडभावनेने नव्हे तर जरब बसवण्यासाठी ही कामगिरी केली.हा केवळ हल्ल्याला प्रतिसाद नव्हता तर धोरणात्मक समीकरणातला मोठा बदलहोता असं त्यांनी सांगितलं. ऑस्ट्रियातले तज्ञ लेखक टॉम कूपरयांनी या नेमक्या हालचालींबद्दल तसंच हवाई दल आणि लष्कराच्या योग्य वापराबद्दल या कारवाईची प्रशंसा केली आहे. दहशतवादाविरोधात लढताना अण्वस्त्रांच्या धमकीसमोर न झुकण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भूमिका प्रशंसनीय असल्याचा उल्लेख दोन्ही तज्ज्ञांनी आपापल्या समाज माध्यमावरच्या लिखाणात केला आहे. भारतीय सशस्त्र दलांनी राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरने जगाचे लक्ष वेधलं आहे. या मोहिमेच्या यशस्वितेमागे आकाशतीर ही हवाई संरक्षण प्रणाली असून या प्रणालीने पाकिस्तानी ड्रोन, क्षेपणास्त्रं तसंच अन्य शस्त्रांस्त्रांना रोखण्यात आणि निष्क्रीय करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पूर्णपणे स्वदेशी बनावटीची ही एआय आधारित प्रणाली असून ही भारताच्या वाढत्या तांत्रिक स्वावलंबनांच प्रतीक आहे.

-------------------------------------

अरुणाचल प्रदेश

अरुणाचल प्रदेशातल्या ठिकाणांची नावं बदलण्याचे चीनचे प्रयत्न अजूनही चालू असून ते निराधार आणि निष्फळ असल्याचं भारतानं म्हटलं आहे.परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जयस्वाल यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं, की हे चीनचे प्रयत्न भारताला पूर्णपणे अमान्य आहेत.अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य आणि अभिन्न हिस्सा होता,आहे आणि राहील तसंच कोणत्याही सर्जनशील नामकरणामुळे हे सत्य बदलू शकत नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.

-----------------------------------

बावनकुळे-इनाम जमिनी

राज्यात देवस्थान इनाम जमिनी मोठ्या प्रमाणावर असून, या जमीनींच्या होत असलेल्या खरेदी विक्रीच्या व्यवहारांबाबत सरकार धोरण ठरवत असल्यामुळे या जमिनींची दस्त नोंदणी थांबवण्याचे निर्देश, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिले. मंत्रालयात यासंदर्भात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. देवस्थान इनाम मिळकतीच्या अनुषंगाने शासनस्तरावर धोरण ठरवण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगी खेरीज किंवा न्यायालयाचे आदेश असतील त्याशिवाय राज्यातील सर्व देवस्थानच्या खरेदी आणि विक्रीच्या व्यवहारांची नोंदणी केली जाऊ नये. जर व्यवहार झाले तर त्यास दुय्यम निबंधक यांना जबाबदार धरण्यात येईल असं बावनकुळे यांनी सांगितलं. सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी पश्चिम महाराष्ट्र देवस्थानच्या जमिनीबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर हा निर्णय घेण्यात आला.

-----------------------------------

कामठी रुग्णालय

नागपूर जिल्ह्यामध्ये आरोग्य विभागाच्या विविध सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी पदमान्यता, नवीन शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच जुन्या दवाखान्यांचे श्रेणीवर्धन करणे आवश्यक होते. असे अनेक निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतले. तर कामठी येथे शंभर खाट्यांच्या रुग्णालयासाठी सहा एकर जमीन उपलब्ध करुन देण्याचाही निर्णय घेण्यात आला. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, नागपूर शहर विस्तारत आहे. त्यामुळे त्याठिकाणी आरोग्याच्या सेवा योग्य पद्धतीने होणे अपेक्षित आहे. कामठी येथे ५० खाटांचे रुग्णालय आहे. ते १०० खाटांचे करण्यात यावे. त्याच्या बांधकामासाठी ५ एकर जागेची आवश्यकता

असून ती जागा उपलब्ध करुन देण्याचे आश्वासही महसूलमंत्र्यांनी दिले. ग्रामीण रुग्णालय कुही इथं  सध्या ३० खाटांचे रुग्णालय असून त्याचे श्रेणीवर्धन करुन ते ५० खाटांचे करण्यात यावे. त्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन दिला जाईल असे निर्देशही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

---------------------------------------

छत्रपती संभाजी महाराज जयंती

पुरंदर किल्ल्यावरील माची आणि छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म झालेल्या वाड्यांच्या भिंतीची पुनर्बांधणी, संवर्धन आणि जतनाच्या अनुषंगाने लष्कराशी चर्चा करून सकारात्मक प्रयत्न करू, अशी ग्वाही राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज दिली.किल्ले पुरंदर इथं छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त, त्यांच्या पुतळ्यास सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार आणि मराठी भाषा आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. दरम्यान, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त, वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तर मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. आज नागपूर महानगर पालिका आणि महावितरण सह अनेक सरकारी अस्थपनांमध्ये अभिवादनपर कार्यक्रम घेण्यात आले.

---------------------------------------

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

राज्यातल्या एकूण नऊ विभागामध्ये गेल्या मार्च महिन्यात ५ हजार १३० केंद्रांवर दहावीची परीक्षा पार पडली. यापैकी ३७ केंद्र कॉपी प्रकरणात दोषी आढळली असून, या केंद्रांवर कॉपीच्या एकूण ९३ घटना घडल्याची नोंद झाली तर सहा गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी आज दिली. नागपूर विभागात ७ केंद्रांवर २२ घटना आहेत. कॉपीच्या बाबतीत कोल्हापूर, अमरावती, नाशिक आणि कोकण विभाग निरंक आहे.

---------------------------------------

हवामान

विदर्भात आज सर्वत्र वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उद्या आणि परवा देखील विदर्भातील पूर्व भागात अर्थात नागपूर, वर्धा,

भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा यलो अलर्ट जारी करण्यात आलाय. या दरम्यान मेघगर्जना, सोसाट्याचा वारा आणि तुरळक पावसाची शक्यता आहे. अकोला, मुर्तीजापूर आणि आकोट इथ वादळी वाऱ्यांसह पावसाला सुरुवात झाली आहे. दरम्यान, आज चंद्रपूर इथं सर्वाधिक कमाल तापमान 41.2 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं तर नागपुरात 39.8 अंश सेल्सिअस इतका कमाल तापमान नोंदवण्यात आलं.

------------------------------------

खेलो इंडिया

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत, आज महाराष्ट्राने आणखी एक सुवर्ण आणि एक रौप्य पदक मिळवल्यानं एकूण पदक संख्या १२२ झाली आहे. स्पर्धेच्या १० व्या दिवशी काल महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पदकांची शतकपूर्ती केली. सध्या ४७ सुवर्ण आणि ३९ रौप्य आणि ३६ कांस्य पदकं मिळवून महाराष्ट्र पदक तालिकेत अव्वल स्थानावर आहे. १९ सुवर्ण आणि ९ रौप्य पदकांसह ४२ पदकं मिळवून राजस्थान दुसऱ्या तर हरियाणा तिसऱ्या स्थानावर आणि कर्नाटक चौथ्या स्थानावर पोहोचला आहे. खेलो इंडिया स्पर्धेचा आज ११वा दिवस असून उद्या समारोप होईल.

------------------------------------